# केंद्रीय सांस्कृतिक राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांची मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय संदर्भ विभागाला सदिच्छा भेट



■ **मुंबई**

दिनांक ४ मे रोजी दुपारी 3च्या सुमारास अर्जुनराम मेघवाल, केंद्रीय राज्य सांस्कृतिक मंत्री यांनी साहित्य अकादमीच्या अधिकाऱ्यांसह मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संदर्भ विभागाला सदिच्छा भेट दिली. पुस्तके आस्थेने पाहिली. साहित्य अकादमीचे कार्यालयात आलेल्या मंत्र्यांनी आपल्या व्यस्त कार्यक्रमातूनही वेळ काढून दादर पूर्व येथीलग्रंथसंग्रहालयाच्या संदर्भ विभागातील ग्रंथसंपदा आस्थेने पाहिली व कौतुकही केले. या भेटीदरम्यान त्यांच्यासह साहित्य अकादमीचे कृष्णा किंबहुने, संदर्भ कार्यवाह उमा नाबर आदी मान्यवर उपस्थित होते.